जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२८५६०/२०२३

वाहतूक नियंत्रण अधिसुचना दिनांक -०४/०८/२०२३

दिनांक ०६/०८/२०२३ रोजी मा. व्ही व्ही आय पी हे चिंचवड वाहतुक विभाचे हद्दीत प्रा. रामकृष्ण मोरे सभागृह चिंचवड या ठिकाणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमाचे अनुषंगाने कार्यक्रमास मोठ्या संख्येने कार्यकर्ते, प्रतिनीधी इतर नागरीक उपस्थित राहणार असल्याने मा. व्ही व्ही आय पी बंदोबस्ताच्या अनुषंगाने चिंचवड वाहतुक विभाग हद्दीतील मार्गावर वाहनांसाठी काही रस्ते बंद करणे गरजेचे आहे

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त परि २ अति.कार्य वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर,यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालील प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## चिंचवड वाहतूक विभाग

१) महावीर चौक – महावीर चौकाकडुन चिंचवडगांवाकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी रस्ता - सदरची वाहने ही महावीर चौक कडुन खंडोबा माळ चौक येथुन इच्छित स्थळी जातील.

२) दर्शन हॉल लिंक रोड – लिंकरोड कडुन अंहिसा चौकाकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

पर्यायी रस्ता – सदरचे वाहने ही मोरया हॉस्पीटल चौक कडुन इच्छित स्थळी जातील.

३) रिव्हर व्हयुव चौक- रिव्हर व्हयुव चौकाकडुन चाफेकर चौक, अहिंसा चौक बाजुकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे.

पर्यायी रस्ता - सदरचे वाहने हे रिव्हर व्हीव चौकाकडुन वाल्हेकरवाडी,बिजलीनगर मार्गे इच्छित स्थळी जातील.

वरील वाहतुक बदल दि.०६/०८/२०२३ रोजी सकाळी.०८/०० वाजता दुपारी.१५/०० वा. पर्यंत अथवा वाहतुक सुरळित होईपर्यंत (अत्यावश्यक सेवेतील व कार्यक्रमासाठी येणारी निमंत्रीतांची वाहने वगळुन) सर्व प्रकारचे वाहने वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त, परि २.
अति.कार्य वाहतूक पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून सदरची बातमी वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी, चिंचवड वाहतुक विभाग
४) कार्यकारी अभियंता, ब प्रभाग, पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner